**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२७/२०१९**

**निशाण क्र. /**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन) प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेला २०१९ चा अविलंबित खटला अनुक्रमांक २२७ चा अभिलेख.

**आर.डि.शिंदे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी यांचे कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | – | २४/०८/२०१८ |
| २. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | – | ०२/०१/२०१९ |
| ३. फिर्यादराचे नांव, त्याच्या आई व बापाचे नांव त्याचे वय व त्याचे निवासस्थान | – | महाराष्ट्र सरकार (तर्फे पोलीस ठाणे, राधानगरी) |
| ४. आरोपींचे नांव, आरोपीच्या आई व बापाचे नांव, त्याचे वय व निवासस्थान | – | **अक्षय कृष्णात पाटील** व.व.२५ वर्षे, व्यवसायः शेती रा. ठिकपुर्ली, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर |
| ५ (अ) ज्या बद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | – | आरोपाचा आशय |

दिनांक २४/०८/२०१८ रोजी ११.३० वाजताचे सुमारास भोगावती ते शेळेवाडी जाणारे रोडवर, ठिकपुर्ली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटरसाकयल नंबर.एम.एच.०९.ई.झेड.६९८२ ही रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन, निष्काळजीपणे, हयगयीने व भरधाव वेगाने चालवुन मानवी जीवत धोक्यात येईल किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचेल असा गुन्हा केला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम २७९ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

दुसरे असे की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही मानवी जीवीत किंवा

इतरांची व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने तुमच्या ताब्यातील मोटरसाकयल नंबर.एम.एच.०९.ई.झेड.६९८२ ही चालवून पायी जाणारे फिर्यादी नामे लहू विष्णू साठे यांना धडक दिल्याने जखमी झाले आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

तिसरे असे की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही मानवी जीवीत किंवा इतरांचे व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने तुमच्या ताब्यातील मोटरसाकयल नंबर.एम.एच.०९.ई.झेड.६९८२ चालवून पायी चालत जाणारे वर नमुद फिर्यादी यांना धडक दिल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होवुन ते जखमी झाले आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

चौथे असे की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटरसाकयल नंबर.एम.एच.०९.ई.झेड.६९८२ हे वाहन हयगयीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात केला आणि त्याद्वारे तुम्ही मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

पाचवे असे की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटरसाकयल नंबर.एम.एच.०९.ई.झेड.६९८२ हे वाहन हयगयीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात केला व सदर अपघाताची माहीती नजीकच्या पोलीस ठाणेत न देता घटनास्थळावरुन निघुन गेला आणि त्याद्वारे तुम्ही मोटर वाहन कायद्याचे कलम १३४(अ)(ब) खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

शेवटी असे की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही तुमच्याकडे कोणताही वाहन चालविण्याचा वैद्य परवाना नसताना तुमच्या ताब्यातील मोटरसायकल नंबर.एम.एच.०९.ई.झेड.६९८२ हे वाहन हयगयीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात केला आणि त्याद्वारे तुम्ही मोटर वाहन कायद्याचे कलम ३(१) सह कलम १८१ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

(ब) कलम व अधिनियम – भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्या कलम १८४, १३४(अ)(ब) ३(१)/१८१ प्रमाणे.

(क) मालमत्तेचे मुल्य – ------

**<u>आरोपीचे प्रतिकथनः</u>**

प्रश्न १. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तरः होय

प्रश्न २. आता तुमचेवर ठेवणेत आलेला दोषारोप तुम्हाला मराठीतून वाचून दाखविला व समजावुन सांगीतला तो तुम्हाला समजला काय?

उत्तरः होय

प्रश्न ३. तुम्हाला विधीसेवेची मदत हवी आहे काय ?

उत्तरः नाही.

प्रश्न ४. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तरः मला गुन्हा कबुल नाही.

..................................

**आरोपीची सही.**

RAJENDRA DHANAJI SHINDE Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE Date: 2025.06.24 11:11:45 +0530

**(आर.डि.शिंदे)**

दिनांकः२३/०६/२०२५ प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, राधानगरी